महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा
सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग)
आरोग्य भवन, विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर,
आळंदी रोड, येरवडा, पुणे - ४११ ००६

सहसंचालक (वै) (०२०) २९७०५९५३
सहसंचालक (का) (०२०) २६६८६९५५
उपसंचालक (०२०) २६६८६९५१
कार्यालय (०२०) २६६८६९५२-५४-५६

विभागवार ईमेल आयडी :-
TB Section - stomh@rntcp.org
Lep Section- jtlepnms@rediffmail.com
Est Section - jdhsest९९@gmail.com

आरोग्य सेवा

जा.क्र.ससंआसे/कुष्ठवक्षय/भांडार/फोटोकॉपीयर/देखभाल दुरुस्ती करार/ /२६
दिनांक ०२/११/२०२६ 29628-25

नोटीस

विषय - झेरॉक्स मशीनसाठी वार्षिक देखभाल दुरुस्ती AMC (Annual Maintenance Contract) करणेसाठी दरपत्रके सादर करणेबाबत

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, कार्यालयात खालील कंपनीचे झेरॉक्स मशीन वापरात आहेत.

१) कोनिका २१५	- २ नग	२) तोशिबा २३०७	- ३ नग
३) तोशिबा ३०७	- १ नग	४) शार्प एआर ६०२०	- ३ नग

सदर मशीन सुस्थितीत ठेवण्यासाठी किमान एक वर्षाचा वार्षिक देखभाल व दुरुस्ती सेवासंविदेचा करार करावयाचा आहे. तरी इच्छूक स्थानिक निविदाधारकांनी यांनी दि**१७/११**/२०२६ पर्यंत सहसंचालक, आरोग्य सेवा, (कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे ६ यांचे नावे बंद लिफाफयात दरपत्रक निविदा सोबतच्या विहीत नमुन्यात सादर कराव्यात. सादर करण्यात येणा-या दरपत्रक लिफाफयावर ठळक अक्षरामध्ये **झेरॉक्स मशीनसाठी वार्षिक देखभाल दुरुस्तीचे दरपत्रक** असा उल्लेख करावा.

दरपत्रक निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील

१) झेरॉक्स मशीनसाठी वार्षिक देखभाल दुरुस्ती सेवासंविदेचा करार एक वर्षासाठी करावयाचा आहे. वार्षिक देखभाल व दुरुस्ती करारासाठी येणाऱ्या खर्चाची **वार्षिक रक्कम प्रतिनग** दर्शविण्यात यावी.

२) झेरॉक्स मशीनसाठी वार्षिक देखभाल दुरुस्ती सर्व्हीसिंग आवश्यकतेनुसार करणे अनिवार्य राहिल.

३) झेरॉक्स मशीन नादुरुस्त असल्याचे कार्यालयाचे निदर्शनास आल्यास कार्यालयाने कळविल्यानंतर आपले संस्थेच्या तज्ञ इंजिनिअर तातडीने कार्यालयात येवून मशीनची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

४) झेरॉक्स मशीनचे संबंधित सर्व सुटे भाग खराब अथवा नादुरुस्त झाल्यास ते दुरुस्त करणे शक्य नसल्यास नवीन सुटे भाग कक्ष अधिकारी, भांडार शाखा तसेच कार्यालयाचे मान्यतेने बदलण्यात यावेत. नवीन बसविण्यात येणारे सुटे भागाची वॉरंटी १ वर्षाची असली पाहिजे.

५) नवीन सुटे भागासाठी येणारा खर्च स्वतंत्रपणे मंजुर करण्यात येईल. त्याबाबत सोबतचे "प्रपत्र १ ते ४" मध्ये साहित्याच्या सुटे भागांच्या यादीमध्ये दर नमुद करावेत. "प्रपत्र १ ते ४" मधील यादीव्यतिरिक्त कोणतेही सुटे भाग बदलणे आवश्यक असल्यास त्याबाबत पुर्वपरवानगीने बाजारभावानुसार सदरचे संबंधित सुटे भाग बदलण्यात यावेत.

६) सदर देखभाल व दुरुस्ती कराराचे देयके करार झाल्यानंतर अनुदान उपलब्धतेनुसार करण्यात येतील. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास व्याज देय राहणार नाही व यासंबंधी आगाऊ रक्कम अदा करण्यात येणार नाही. देयके सादर करताना तीन प्रतीमध्ये सादर करणे आवश्यक आहे.

७) वार्षिक देखभाल व दुरुस्ती करार हा आपली सेवा असमाधानकारक असल्याचे आढळून आल्यास, आवश्यकतेनुसार तात्काळ अथवा योग्य ती पूर्वकल्पना देऊन निर्गमित करण्यात आलेले आदेश तात्काळ रद्द करण्याचे अधिकार सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे ६ यांनी राखुन ठेवले आहेत.

८) सोबत नमुद केलेल्या **विहीत नमुन्यामध्येच** आपले संस्थेच्या / कंपनीच्या लेटरहेडवर अथवा नावाने दरपत्रके सादर करावीत. विहीत केलेल्या नमुन्याव्यतिरिक्त दरपत्रक सादर केल्यास दरपत्रक अपात्र ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी. दरपत्रक सादर करताना आपल्या संस्थेच्या कोणत्याही अटी व शर्ती या कार्यालयास लागू राहणार नाहीत.

९) **"प्रपत्र १ ते ४"** मध्ये झेरॉक्स मशीनसाठी लागणा-या सुटे भाग / साहित्याचे दर नमुद करावेत. सदरचे साहित्याचे दर हे कार्यालयाच्या मागणीनुसार पुढील एक वर्षासाठी निश्चित राहतील. त्याच दराने सदरचे साहित्याचा पुरवठा करणे बंधनकारक राहिल.

१०) वार्षिक देखभाल दुरुस्ती करार (AMC) करणेसाठीचे दरपत्रकांमधील पात्र ठरलेल्या न्यूनतम दर असलेल्या (L१) पुरवठादाराचे प्रपत्र १ ते ४ मधील साहित्याचे दर हे इतर पुरवठादार यांचेपेक्षा अधिक असल्यास अंतिम तुलनात्मक तक्त्यानुसार इतर पुरवठादार यांचेपेक्षा कमी दराने साहित्याचा पुरवठा करणे आवश्यक राहील.

११) निविदाधारक संस्थेचे कार्यालय / अधिकृत सेवा केंद्र (Service Center) पुणे शहर किंवा परिसरात असणे अनिवार्य आहे, जेणेकरून आवश्यकता असेल त्यावेळी तातडीने ऑन-साइट सेवा देणे शक्य होईल. सेवा केंद्राचा (Service Center) सविस्तर पत्ता व संपर्क क्रमांक दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

१२) कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार या कार्यालयाने राखुन ठेवला आहे. अंतिम दिनांकानंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही. दरपत्रकासोबत संस्थेचा जीएसटी क्रमांक नोंदणी प्रमाणपत्र / पॅन कार्ड व तदनुषंगिक प्रमाणपत्रे इ.च्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

(डॉ. राधाकिशन पवार),
सहसंचालक, आरोग्य सेवा,
(कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे

प्रत - या कार्यालयाच्या सुचना बोर्डसाठी
प्रत - विभागाचे संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी

निविदा

फोटोकापीयर झेरॉक्स मशीन वार्षिक देखभाल दुरुस्ती दरकरार फार्म

प्रति,

मा. सहसंचालक, आरोग्य सेवा,
(कुष्ठरोग व क्षयरोग), आरोग्य भवन, विश्रांतवाडी पोलिस स्टेशन समोर,
आळंदी रोड, येरवडा, पुणे ४११ ००६

विषय – झेरॉक्स मशीनसाठी वार्षिक देखभाल दुरुस्ती करार AMC (Annual Maintenance Contract) करणेसाठी दरपत्रके सादर करणेबाबत

सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे (खुद्द) येथील झेरॉक्स मशीनसाठी वार्षिक देखभाल दुरुस्ती करार करण्यासाठी दरपत्रके मागविण्यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. आमची संस्था / कंपनी नोंदणीकृत असून संगणक क्षेत्रातील कामाचा आम्हाला अनुभव असून खालील ठिकाणी करार केलेला असून सदरचे कामकाज आम्ही केलेले आहे.

अ.क्र.	संस्थेचे / कंपनीचे नाव	कालावधी
१		
२		
३		

सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे ६ (खुद्द) येथील झेरॉक्स मशीनसाठी वार्षिक देखभाल दुरुस्ती करार AMC (Annual Maintenance Contract) करण्यासाठी आमची कंपनी **झेरॉक्स मशीन वार्षिक देखभाल दुरुस्ती खर्च** खालीलप्रमाणे दर आकारणार आहे.

अ.क्र.	झेरॉक्स मशीनचा तपशिल	नग	वार्षिक देखभाल दुरुस्तीचे प्रति नग दर (सर्व करांसहित)
१	कोनिका २१५	०२	
२	तोशिबा २३०७	०३	
३	तोशिबा ३०७	०१	
४	शार्प एआर ६०२०	०३	

आपला,

(नाव/सही/कंपनीचा/संस्थेचा शिक्का)

" प्रपत्र - १ "

झेरॉक्स मशीनसाठी लागणा-या साहित्याचे वार्षिक दर

कोनिका २१५

अ.क्र.	साहित्याचे नाव	नग	दर सर्व करांसहित
१	Toner	१	
२	Drum	१	
३	Developer	१	
४	Hot Roller (Heater Kit)	१	
५	Bled	१	
६	Sepration Roller	१	
७	Feed Roller	१	

आपला

(नाव/सही/कंपनीचा/संस्थेचा शिक्का)

" प्रपत्र - २ "

झेरॉक्स मशीनसाठी लागणा-या साहित्याचे वार्षिक दर

तोशिबा २३०७

अ.क्र.	साहित्याचे नाव	नग	दर सर्व करांसहित
१	Toner	१	
२	Drum	१	
३	Developer	१	
४	Hot Roller (Heater Kit)	१	
५	Bled	१	
६	Sepration Roller	१	
७	Feed Roller	१	

आपला

(नाव/सही/कंपनीचा/संस्थेचा शिक्का)

" प्रपत्र - ३ "

झेरॉक्स मशीनसाठी लागणा-या साहित्याचे वार्षिक दर

तोशिबा ३०७

अ.क्र.	साहित्याचे नाव	नग	दर सर्व करांसहित
१	Toner	१	
२	Drum	१	
३	Developer	१	
४	Hot Roller (Heater Kit)	१	
५	Bled	१	
६	Sepration Roller	१	
७	Feed Roller	१	

आपला

(नाव/सही/कंपनीचा/संस्थेचा शिक्का)

" प्रपत्र - ४"

झेरॉक्स मशीनसाठी लागणा-या साहित्याचे वार्षिक दर

शार्प एआर ६०२०

अ.क्र.	साहित्याचे नाव	नग	दर सर्व करांसहित
१	Toner	१	
२	Drum	१	
३	Developer	१	
४	Hot Roller (Heater Kit)	१	
५	Bled	१	
६	Sepration Roller	१	
७	Feed Roller	१	

आपला

(नाव/सही/कंपनीचा/संस्थेचा शिक्का)

दरपत्रक निविदेचा कालावधी खालीलप्रमाणे

अ.क्र.	निविदा प्रक्रिया तपशिल	कालावधी
१	दरपत्रक निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक	०४-११-२०२६
२	दरपत्रक निविदा सादर करण्याचा कालावधी (कार्यालयीन वेळेत)	०४-११-२०२६ ते १७-११-२०२६
३	झेरॉक्स मशीन साहित्य पाहण्याचा कालावधी (कार्यालयीन वेळेत)	०४-११-२०२६ ते १७-११-२०२६
४	दरपत्रक निविदा उघडण्याचा संभाव्य दिनांक	१८-११-२०२६